दैनिक अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक २९९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२२ जानेवारी २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मुंबई गोवा महामार्गावर भीषण अपघातात १ ठार ३ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई गोवा महामार्गावर पनवेल जवळ झालेल्या कार अपघातात १ जागीच ठार झाले तर तिघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे. सकाळी पावणे आठ वाजण्याच्या सुमारास पनवेल जवळील तुरमाळे गावाजवळ हा भीषण अपघात झाला.

मुंबई कडे जाणाऱ्या लेनवर सँट्रो कार क्रमांक एम.एच १२ इ.एन ६७०९ याच्या वाहनावरील वाहनावरील ताबा सुटल्याने सदर गाडी ही भरधाव असल्याने पुढे चाललेल्या ट्रेलरला जोरदार धडक दिली. या अपघातात कार त्यात कंटेनरच्या मागील बाजुस अडकून पडली. त्यामध्ये अलोरे मोहल्लयातील १ जागीच ठार झाले तर अन्य तिघेजण जखमी झाले यातील सर्वजण अलोरे मोहल्लयातील होते. सदर अपघाती निधनाने सर्वांना धक्का बसला आहे. संपुर्ण मोहल्यात शोककळा पसरली आहे. घटनास्थळी तात्काळ पनवेल शहर पोलीस आले व त्यांनी कार मधील ईतर जखमीना इस्पितळात नेण्यास मदत केली या अपघाताचा पुढील तपास महाडीक करीत आहेत.

# सीरम इन्स्टिट्यूटच्या आगीत ५ जणांचा मृत्यू

## आगीत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २५ लाखांची मदत : सायरस पुनावला

**दै.रायगड नगरी । पुणे**

**कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लसीची निर्मिती करणाऱ्या पुण्यातील सीरम इन्स्टिट्यूटच्या नवीन इमारतीला दुपारी दोन वाजताच्या सुमारास आग लागली. या आगीत पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली आहे.**

सीरमच्या बीसीजी लस बनवण्याच्या इमारतीला दुपारी दोन वाजेच्या सुमारास आग लागलेली आहे. ज्या ठिकाणी बीसीजी लस बनवली जाते त्या ठिकाणी आग लागली. सीरम इन्स्टिट्यूटचा हा मांजरी भागातील नवीन प्लांट आहे. मी जिल्हाधिकाऱ्यांशी बोललो आहे. बिल्डिंगचे काम सुरू होते. वेल्डिंग स्पार्कमुळे ही आग लागल्याची शक्यता आहे. आता आग विझवण्यात आली आहे. या आगीत पाच जणांचे मृतदेह आढळले आहेत. हे मृतदेह नोबेल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहेत, असे राजेश टोपे म्हणाले. याचबरोबर, कोरोना लस निर्मिती जिथे होते, ती इमारत घटनास्थळापासून लांब आहे. त्यामुळे कोरोना लसीचे कोणतेही नुकसान नाही. यासंदर्भात पोलिस तपास सुरु आहे, असे राजेश टोपे यांनी सांगितले.

दुसरीकडे, पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ यांनीही घटनास्थळी जाऊन पाहणी केली. यावेळी ते म्हणाले, या आगीत पाच जणांचा मृत्यू झाला आहे. त्यांचे मृतदेह ताब्यात घेऊन ते शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. या इमारतीचे बांधकाम सुरु होते. तिथे विजेचे आणि वेल्डिंगचे काम सुरु होते, त्यादरम्यान ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. मृतांमध्ये इमारतीचे बांधकाम करणारे कंत्राटी कामगार असू शकतात.



दरम्यान, पुण्यातील मांजरी परिसरातील गोपाळपट्टा भागात असलेल्या सीरम इन्स्टिट्यूटच्या नवीन इमारतीला ही आग लागली. मात्र, सुदैवाने ज्या इमारतीमध्ये कोव्हिशील्ड लस निर्मितीचे काम सुरु आहे, त्या ठिकाणी ही आग लागली नसल्याचे सांगण्यात येत आहे. ज्या इमारतीमध्ये आग आ-गली. त्यामध्ये बीसीजी विभाग आहे. या इमारतीत बीसीजीची लस तयार करण्याचे काम चालते. कोरोना लसीचे संशोधन आणि उत्पादनाचा विभाग या ठिकाणी नसल्याचे सीरम इन्स्टिट्यूटकडून सांगण्यात आले आहे.

पुण्याच्या सीरम इन्स्टिट्यूटच्या इमारतीला लागलेल्या आगीत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २५ लाखांची मदत 'सीरम इन्स्टिट्यूट'कडून जाहीर करण्यात आली आहे. आगीत सीरमच्या पाच कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. सीरम इन्स्टिट्यूटसाठी आजचा दिवस अतिशय दु:खद आहे. दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. कंपनीच्या निर्धारित नियमांच्या पलिकडे जाऊन दुर्घटनेतील मृत्यूमुखींच्या कुटुंबियांना प्रत्येकी २५ लाखांची मदत जाहीर करत आहोत, असं सीरमचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सायरस पुनावला यांनी म्हटलं आहे.

## संक्षिप्त...

### अंडरवर्ल्ड डॉन दाऊदच्या हस्तकाच्या ड्रग्ज फॅक्टरीवर छापेमारी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईमध्ये ड्रग्जविरोधात मोहीम राबवण्यासाठी NCB ने कंबर कसली आहे. आता NCB ला मोठं यश मिळालं आहे. मुंबईच्या ठिकठिकाणी NCB कडून छापेमारी सुरु आहे. आज सकाळपासून सुरु असलेल्या एका ऑपरेशनमध्ये NCB ने दक्षिण मुंबईतील एका ड्रग्ज फॅक्टरीचे भांडाफोड केले आहे. हे ऑपरेशन अजूनही सुरु आहे. या ड्रग्ज फॅक्टरीशी संबंधित व्यक्तींची नावे आणि धागेदोरे यांची चौकशी केली जात आहे. या फॅक्टरीमध्ये मोठ्या प्रमाणावर एमडी ड्रग्जचे उत्पादन केले जात होते. एनसीबीने या फॅक्टरीमधून मोठया प्रमाणावर एमडी (मेफेड्रोन) बनवण्यासाठी ठेवलेलं कच्चे सामान (रॉ मटेरियल) जप्त केले आहे.

ही फॅक्टरी ड्रग्ज माफिया आणि गँगस्टर चिंकू पठाण उर्फ परवेज खानच्या साथीदाराद्वारे चालवली जात होती. एनसीबीच्या अधिकाऱ्यांनी येथून ड्रग्सशिवाय अग्निशस्त्र आणि मोठ्या प्रमाणावर रोकड जप्त करण्यात आली आहे. ही रोकड करोडोंची असल्याचं बोललं जात आहे. २० जानेवारीला एनसीबीनी चिंकू पठाणला अटक केली. त्यानंतर ही मोठी छापेमारी करण्यात एनसीबीला यश आलं आहे. चिंकू पठाण हा अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा हस्तक असून गँगस्टर करीम लालाचा नातेवाईक देखील आहे. मुंबई आणि मुंबईच्या आजूबाजूच्या परिसरात सप्लाय केल्या जाणाऱ्या एमडी ड्रग्ज हे ७० टक्के चिंकू सप्लाय करत होता. एनसीबीद्वारे ड्रग्स फॅक्ट्री आणि त्याचे आंतरराष्ट्रीय कनेक्शनचा तपास केला जात आहे. चिंकूचे साथीदार इंटरनॅशनल ड्रग कार्टलशी जोडलेले आहेत, त्यांचे इंटरनॅशनल क्लाइंट्स देखील आहेत. आता एनसीबीने दक्षिण मुंबईत केलेल्या छापेमारीमुळे मुंबई आणि देशभरात पसरलेल्या अमली पदार्थाच्या जाळ्याचा पर्दाफाश होऊ शकतो.

**जमीन विकणे आहे**

पाली-खोपोली मार्गावर नानोसे गावाजवळील पेट्रोल पंपाच्या समोर असलेली रोड टच २१ गुंठे शेतजमीन जागा विकणे आहे.

संपर्क : 8108618486

## बारावी २३ एप्रिल तर दहावीची परीक्षा २९ एप्रिल पासून

**दै.रायगड नगरी । मुंबई**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता १२ वी ची लेखी परीक्षा दिनांक २३ एप्रिल तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १० वी) ची लेखी परीक्षा दिनांक २९ एप्रिल पासून सुरु होणार असल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी केली. मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी अपर मुख्य सचिव वंदना कृष्णा, शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी, परीक्षामंडळ संचालक दिनकर पाटील उपस्थित होते.



प्रा. गायकवाड पुढे म्हणाल्या, इयत्ता १२ वी ची प्रात्यक्षिक परीक्षा १ एप्रिल ते २२ एप्रिल दरम्यान होईल तर लेखी परीक्षा २३ एप्रिल ते २९ मे २०२१ या कालावधीत घेण्यात येईल. या परीक्षेचा निकाल अंदाजे जुलै २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल. इयत्ता दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा ९ एप्रिल ते २८ एप्रिल या दरम्यान होतील तर लेखी परीक्षा २९ एप्रिल २०२१ ते ३१ मे २०२१ या कालावधीत घेण्यात येतील. या परीक्षेचा निकाल ऑगस्ट २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल.

कोविड १९ च्या संदर्भात केंद्र व राज्य शासन तसेच आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या अधीन राहून परीक्षा आयोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. राज्यात इ. ९ वी ते इ.१२ वी च्या शाळांमध्ये दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढत असून दि.१८ जानेवारी २०२१ रोजी २१ लाख ६६ हजार ५६ विद्यार्थी शाळांमध्ये येत आहेत व २१ हजार २८७ शाळा सुरू आहेत. यात एका दिवशी केवळ पन्नास टक्के उपस्थिती ठेऊन शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. सुमारे ७६.८% विद्यार्थी शाळांमध्ये येत आहेत. अशी माहिती प्रा. गायकवाड यांनी यावेळी दिली.

## पेण तालुक्यातील ६४ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार पेण तालुक्यातील २०२० ते २०२५ पर्यंत सरपंच पदाचे आरक्षण आज प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आले.

अनुसुचित जाती १ गागोदेखुर्द. अनुसूचित जमाती साठी १४ ग्रामपंचायती वरवणे, रोडे, जिर्णे, आंबेघर, कामार्ली, शेडाशी, पाटणोली, कोपर, वाशीवली, आंबिवली, कंरबेली, शिहू, सापोली, बोरगाव. अनुसुचित जमाती महीला ७ ग्रामपंचायती सापोली, आंबिवली, आंबेघर, शेडाशी, कंरबेली, बोरगांव, कोपर. सर्वसाधारण ३२ ग्रामपंचायती दुरशेत, शिर्की, वाकरुळ, रावे, वाशी, मसद बुद्रुक, बोरी, वरेडी, आमटेम, सोनखार, बेणसे, दिव, उंबर्डे, अंतोरे, वरप, जावळी, कणे, खरोशी, बळवली, हमरापूर, वडखळ, मलेघर, बोर्झे, निगडे, बेलवडे बुद्रुक, वरसई, मुंढाणी, पाबळ, तरणखोप, वढाव, कालेश्री, कळवे. सर्वसाधारण महिला १६ ग्रामपंचायती जावळी, कणे, खरोशी, निगडे, कालेश्री, दिव, बोर्झे, मुढांणी, वरसई, मलेघर, वडखळ, पाबळ तरणखोप, बेणसे, बळवली, या ग्रामपंचायती आरक्षित करण्यात आल्या आहेत असे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांनी जाहीर केले.

आरक्षित करण्यात आलेल्या ग्रामपंचायतीच्या नांवाची सोडत चिठ्ठी काढून करण्यात आली यावेळी तहसिलदार अरूणा जाधव, नायब तहसीलदार धनंजय कांबळे, डॉ.जाधव, पोलिस निरीक्षक बाळकृष्ण जाधव, जिल्हापरिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, पं. सभापती सरिता म्हात्रे यासह शिवसेना कॉंगेस भाजप व राष्ट्रवादी मनसे कार्यकर्ते उपस्थित होते.

## जेएनपीटीने सिडकोबरोबर केला सामंजस्य करार

### सिडको करणार साडेबारा टक्के भूखंडावर पायाभूत सुविधांचा विकास

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटीने प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के योजनेतील भूखंड वाटपासाठी शहर व औद्योगिक विकास महामंडळा (सिडको) सोबत सामंजस्य करार केला आहे. जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी आणि सिड्कोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. यावेळी जेएनपीटीचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ उपस्थित होते.

नौकानयन मंत्रालयाने २३ मे, २०१९ रोजी महाराष्ट्र सरकारच्या साडेबारा टक्के योजनेअंतर्गत जेएनपीटीच्या प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात येणा-या जमीनीवर सिडकोच्या माध्यमातून पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठीचा रु.३७६.२० कोटी रुपये खर्चाच्या जेएनपीटीच्या प्रस्तावाला मान्यता दिली होती.

या सामंजस्य करारानुसार जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटपासाठी आ-पली १११ हेक्टर जमीन राज्य सरकारकडे हस्तांतरित केली जाईल व सिडकोने प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के पीएमसी शुल्कासाठी सहमती दर्शविली आहे. सामंजस्य करारात असे नमूद करण्यात आले आहे की, सिडकोला या जागेच्या विकासासाठी जो काही खर्च येईल तो जेएनपीटी सिडकोला देईल. सिडकोने हे संपूर्ण विकास कार्य ३६ महिन्यांत पूर्ण करण्याचे मान्य केले आहे.

जेएनपीटीच्या १११ हेक्टर जमीनीच्या हस्तांतरणा व्यतिरिक्त सिड्कोकडून अंतिम आराखड्यानुसार आवश्यक .../२

## सर्व जिल्हा रुग्णालयांचे १५ दिवसात हेल्थ ऑडीट करणार : आरोग्यमंत्री राजेश टोपे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**भंडारा जिल्हा रुग्णालयातील एसएनसीयूला लागलेल्या आगीच्या दुर्घटनेचा चौकशी अहवाल समितीने काल सादर केला. त्यांच्या शिफारशीनुसार या प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक यांना निलंबित करण्यात आले. अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक यांची बदली, एसएनसीयूच्या विभाग प्रमुख तसेच परिसेविका यांच्यावर निलंबनाची आणि दोन अधिपरिसेविका व एक बालरोगतज्ज्ञ यांच्या सेवा समाप्त करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी आज येथे दिली.**



दरम्यान या दुर्घटनेचा बोध घेऊन राज्य शासनाच्या मार्फत राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालयांचे १५ दिवसात हेल्थ ऑडीट करण्यात येणार आहे. त्यासाठी आरोग्य आयुक्त डॉ.रामास्वामी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून त्यांचा अहवाल आल्यानंतर कृती आराखडा तयार करण्यात येईल, असे आरोग्यमंत्री श्री.टोपे यांनी सांगितले. जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून आरोग्यसंस्थांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात सर्व पालकमंत्र्यांना पत्र देण्यात आल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

यासंदर्भात माध्यम प्रतिनिधींशी बोलताना अधिक माहिती देताना आरोग्यमंत्री म्हणाले, चौकशी समितीच्या अभिप्रायानुसार एसएनसीयूमधील इलेक्ट्रीक सक्रीटमध्ये आग लागल्याचे सकृत दर्शनी दिसून येत आहे. या दुर्दैवी घटनेत दहा नवजात बालकांचा मृत्यु झाला. नागपूर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या घटनेची चौकशी केली. त्यामध्ये .../२

### सरपंचपदाचे आरक्षण जाहीर झाल्याने 'कही खुशी कही गम'...

## श्रीवर्धन मधील २२ ग्रामपंचायतींवर असेल महिला राज

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या सोडतीत 'कही खुशी कही गम' असे चित्र पहावयास मिळाले. तालुक्यातील ४३ ग्रामपंचायतीमधील सन २०२० ते २०२५ या कालावधीत सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत तह-सील कार्यालयात गुरुवारी ता. २१ रोजी पार पडली. यात अनेक ठिकाणी फेरबदल झाल्याने 'कही खुशी कही गम' असे चित्र पाहायला मिळाले.

तालुक्यातील ४३ ग्रामपंचायतीच्या २०२०-२५ च्या सरपंचपदाचे आरक्षण काढण्यासाठी श्रीवर्धन तहसील कार्यालयात सकाळी अकरा वाजता सोडत काढण्यात आली. या सोडतीत अनेक उलटफेर झाले असून सरपंच पदासाठी बाशिंग बांधून असलेल्या अनेकांचा हिरमोड झाला असून अनेकांना अनपेक्षितपणे सोडत लागल्याने उत्साह दिसून येत होता. तालुक्यातील बहुतांश मोठ्या ग्रामपंचायतीचे सरपंच पद हे आरक्षित झाल्याने ग्रामीण भागातील पुढाऱ्यांचा चांगलाच हिरमोड झाला आहे. तालुक्यातील ४३ ग्रामपंचायतीमध्ये २२ ग्रामपंचायत ह्या महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. त्यातील सात ग्रामपंचायत ह्या अनुसूचित जाती साठी राखीव तर सहा नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. तसेच १३ ग्रामपंचायत ह्या सर्वसाधारण महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. तर उर्वरित वीस ग्राम पंचायतींपैकी सहा ग्रामपंचायत नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी, तीन अनुसूचित जातीसाठी, बारा सर्वसाधारण सरपंचांसाठी राखीव झाल्या .../२

## अनेक ठिकाणी इच्छूक झाले नाराज तर १२ ठिकाणी महिला सरपंच विराजमान होणार

### रोह्यात ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडत जाहीर

**दै.रायगड नगरी । रोहा**

नुकत्याच पार पडलेल्या २१ ग्रामपंचायतींसह ६४ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडत कार्यक्रम गुरुवारी पार पडले. चिठ्ठया काढून आरक्षण सोडतीत २१ ग्रामपंचायतीपैकी तब्बल १२ महिला सरपंच म्हणून विराजमान होणार आहेत. त्यामुळे सरपंच आरक्षण सोडतीत महिला राज कारभारावर शिक्कामोर्तब झाले आहे. तर या आरक्षण सोडतीत अनेक स्थानिक नेत्यांच्या स्वप्नांवर पाणी पडले.

सरपंच आरक्षणात सोडतीत वाशी ग्रामपंचायतीचे आरक्षण अनु. जमाती महिला पडले. रोठ खुर्द मध्ये सर्वसाधारण महिला, खांब सर्वसाधारण महिला, निडीतर्फे अष्टमीत ना.मा.प्र. महिला, वरवठणे सर्वसाधारण महिला, शेडसई ना.मा.प्र. महिला, वावेपोटगे ना.मा.प्र. महिला, तळाघर ना.मा.प्र. महिला, धामणसई ना.मा.प्र. महिला, चिंचवली तर्फे दिवाळी जमाती महिला, महत्वाच्या सर्वच ग्रामपंचायती सरपंच आरक्षण महिला पडल्याने अनेक ग्रामपंचायत नेतृत्व इच्छुकांना अक्षरशः मूरड मिळाल्याचे दिसून आले. वरसे ग्रामपंचायतीत अपेक्षेप्रमाणे सरपंच आरक्षण सर्वसाधारण पडले. वरसे, रोठ बुद्रूक, गोवे, शेणवई ग्रामपंचायतीत सर्वसाधारण आरक्षण वगळता .../२

# महासत्तेतील नवोदय

अमेरिकेचे ४६वे अध्यक्ष म्हणून जो बायडेन जो बायडेन यांनी शपथ घेतल्यामुळे, एका विकृतपर्वातून अमेरिकेची मुक्तता झाली आहे. अमेरिकेचा आजही असणारा जगावरचा प्रभाव पाहता, एका अर्थाने जगाचीही डोनाल्ड ट्रम्प यांच्या कचाट्यातून सुटका झाली आहे. ट्रम्प यांच्यावर काही कायदेशीर कारवाई झाली नाही, तर ते पुन्हा चार वर्षांनी अध्यक्ष होण्याचे स्वप्न पाहतीलच; पण त्याला अजून बराच अवकाश आहे. ट्रम्प यांचे निर्णय तातडीने फिरवण्यासाठी बायडेन यांनी जी यादी केली आहे; ती पाहिली तरी अमेरिका किती भरकटली होती, याची कल्पना येईल. जागतिक आरोग्य संघटनेला बंद केलेली मदत पुन्हा चालू करणे, मेक्सिकोच्या सीमेवर चाललेले महाकाय भिंतीचे काम थांबवणे, मुस्लिमबहुल देशांतील पर्यटकांवरची बंदी उठवणे, देशात मास्क वापरणे सक्तीचे करणे, जागतिक पर्यावरणाच्या संरक्षणासाठी झालेल्या पॅरिस करारात पुन्हा सहभागी होणे, अशी ही यादी आणखी बरीच मोठी आहे. यातील एकेक कलम अमेरिकेला मागे रेटणारे होते. बायडेन आणि कमला हॅरिस शपथ घेत असताना, अमेरिकेतील करोना बळींची संख्या चार लाखांवर गेली होती आणि एकूण करोनाग्रस्तांचा आकडा अडीच कोटींच्या दिशेने चालला आहे. अर्थव्यवस्थेची गती रोखली जाऊ नये, या तद्दन भांडवलवादी आग्रहाने, करोना काळातील निर्बंधांना विरोध करणाऱ्या ट्रम्प यांनी अमेरिकेत अभूतपूर्व असा मानवी संहार घडू दिला. आखाती किंवा आफ्रिकी हुकूमशहापेक्षा त्यांचे बेफाम वागणे काही कमी घातक नव्हते. अध्यक्षीय निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर त्यांनी आत्ता आत्तापावेतो समर्थकांच्या करवी जो नंगानाच चालविला; त्यामुळे शपथविधीच्या आधी काही शहरांमध्ये लष्कर पाचारण करावे लागते की काय, इतकी परिस्थिती बिघडली. या साऱ्यातून अमेरिकेची आता सुटका झाली असून, बायडेन आणि कमला हॅरिस यांच्यासमोर आव्हानांची मालिका उभी आहे. बायडेन यांचे वय पाहता, त्यांना ओबामा यांचे उपाध्यक्ष म्हणून जे काम करावे लागले; त्यापेक्षा किती तरी जास्त जबाबदाऱ्या कमला यांना पेलाव्या लागू शकतात. कमला यांचा आफ्रो–आशियाई वंशवारसा त्यांना जगात वावरताना अधिक अनुकूलता देतो का, हे लवकरच कळेल. या दोघांना मिळून आधीचे खड्डे बुजवणे आणि नंतर नवी पेरणी, असे दुहेरी आव्हान पेलावे लागणार आहे. सोव्हियत युनियनचा अस्त झाल्यानंतर, गेली तीन दशके जगात अमेरिका ही एकमेव आणि निरंकुश महासत्ता होती. आता 'एकमेव महासत्ता' हे तिचे स्थान अस्ताला जात असताना, डेमॉक्रॅटिक राजवटीचा नवोदय होतो आहे. करोनोत्तर जगात केवळ चीनच नव्हे, तर युरोपीय युनियन, बलाढ्य जर्मनी, नव्याने ताकदवान होणारा रशिया आणि अर्थातच भारत ही नवी शक्तिकेंद्रे उभी राहणार आहेत. चीन तर आजच दुसरी महासत्ता बनला आहे. या पार्श्वभूमीवर बायडेन यांना देशांतर्गत अराजक निस्तरून, जगाच्या नवरचनेकडे नव्या नजरेने पाहावे लागणार आहे. सुशिक्षित भारतीयांना डेमॉक्रॅटिक पक्ष आवडत असला, तरी भारताशी रिपब्लिकन अध्यक्ष अधिक सौहार्दाने वागत आले आहेत. त्यात बुश पितापुत्रासहित ट्रम्पही आलेच. या अर्थाने, ट्रम्प यांच्या जाण्याने भारताचे काही नुकसानही झाले आहे; मात्र प्रचार करताना बायडेन आणि विशेषत: कमला हॅरिस यांनी कितीही भारतविरोधी भूमिका घेतली असली, तरी प्रत्यक्ष कारभार हाकताना त्यांना भारताच्या वाढत्या शक्तीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. नवे संरक्षण मंत्री लॉइड ऑस्टिन यांनी 'भारताशी वाढलेले संरक्षण सहकार्य तसेच वाढते राहील,' असे म्हटले आहे. ते सूचक व पुरेसे आहे. 'अमेरिकेचे हित आणि जगाचे कल्याण' यांच्यात डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार जे सैद्धान्तिक द्वैत उभे केले, ते सर्वाधिक घातक तर होतेच; पण वस्तुस्थितीला सोडून होते. अमेरिकेचे सारे वैभव जगभरातून आलेल्या अफाट बुद्धिसंपदेतून आणि उद्यमशीलतेमधून साकार झाले आहे. अशा वेळी, देशात येणाऱ्यांना अडवण्यापासून वसुंधरा जपण्याचे प्रयत्न धुडकावून लावण्यापर्यंत अनेक नैतिक गुन्हे ट्रम्प सर्रास करीत राहिले. या गुन्ह्यांना त्यांनी राष्ट्रप्रेमाचा झगझगीत अंगरखा चढवला. हा अनाचार धुवून काढताना बायडेन यांना अमेरिकेच्या घसरत्या अर्थव्यवस्थेकडेही लक्ष द्यावे लागणार आहे. करोना कहर मागे ठेवून ट्रम्प फ्लोरिडातील इस्टेटमध्ये जात आहेत. तो निपटून काढणे हे सोपे नाही. जगाचे अर्थकारण पुरते रुळावर यायला २४ ते ३० महिने लागू शकतात. या लढाईत अमेरिकेला पुढे राहून जागतिक बँक; तसेच नाणेनिधीला बळ द्यावे लागेल. तिसऱ्या जगाला हात द्यावा लागेल. मवाळ, सौहार्दाची आणि सहकार्याची भाषा ऐकण्याची सवय अमेरिकेला गेली चार वर्षे राहिलेली नाही. बायडेन यांनी ती पुन्हा जागविली, तरी बऱ्याच गोष्टी सोप्या होतील. अमेरिकेतील हा नवोदय जगाला आणि भारतालाही लाभदायक ठरावा.

# एमआयडीसी प्रकल्पासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी वाचविण्यासाठी लढा देणार : हरिश्चंद्र शिंदे



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यात मागील अनेक वर्षात नवनवीन प्रकल्प, उद्योग, कारखाने, निर्माण झाले. आजही अनेक प्रकल्प प्रस्तापित आहेत, यासाठी लागणाऱ्या जमीनी स्थानिक शेतकऱ्यांकडून कवडीमोल भावाने घेतल्या जातात. स्थानिक शेतकरी व भूमालकावर भूमिहीन होऊन उदरनिर्वाह कसा करावा हे संकट ओढवते. जिल्ह्यात भविष्यात प्रस्तापित एमआयडीसी प्रकल्पासाठी जमिनी खरेदी विक्री करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र शेतकरी एमआयडीसी प्रकल्पास जमिनी विकण्यास तयार नाहीत. रायगड जिल्हा शेतकरी संघटना या सर्व शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहणार , व या शेतकऱ्यांच्या जमिनी वाचविण्यासाठी लढा देणार असल्याचा इशारा रायगड जिल्हा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष हरीचंद्र शिंदे(पाली सुधागड) यांनी दिला आहे.

रायगड जिल्हा शेतकरी संघटनेच्या पालीतील बैठकीत शिंदे बोलत होते. शेतकऱ्यांचे हक्क अधिकार व न्यायहक्कासाठी स्थापन झालेल्या रायगड जिल्हा शेतकरी संघटनेचा विस्तार दिवसागणिक वाढतोय.पाली सुधागडसह रोहा, खालापूर, पेण, म्हसळा, श्रीवर्धन तालुक्यात जिल्हाध्यक्ष हरीचंद्र शिंदे यांच्या नेतृत्वात तसेच रायगड जिल्हा शेतकरी संघटना पेण ,सुधागड,रोहा विधानसभा मतदारसंघ महिला अध्यक्ष कु.रसिका अनिल फाटक यांच्या अथक परिश्रम व पुढाकाराने तसेच सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याने संघटनेला जिल्ह्यात उभारी मिळाली आहे. रायगड जिल्हा शेतकरी संघटना शेतकऱ्यांना शासन योजनांचा पुरेपूर लाभ मिळवून देण्याबरोबरच शेतकऱ्यांचे हित साधण्याचे काम करीत आहेत. शेतकरी विरोधी धोरणांच्या विरोधात रस्त्यावरची व कायदेशीर लढाई लढणे, शेतकऱ्यांना ताकत देणे, संकटात शेतकऱ्याच्या पाठीशी उभे राहून आधार देणे, आस्मानी व नैसर्गिक संकटात शेतकऱ्याला बळ देणे, कृषी क्रांती घडविणे असे संघटनेचे ध्येय उद्दिष्ट असून प्रत्येक पदाधिकारी व सभासदांनी आपली संघटना मजबुतीसाठी तन मन धनाने योगदान द्यावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष शिंदे यांनी केले. रायगड सह कोकणातील कोणत्याही शेतकऱ्यांवर अन्याय झाल्यास आपापल्या तालुक्यातील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी सुधागड तालुका अध्यक्ष पांडुरंग तेलंगे, कैलास दळवी व जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात आली.

# रायगड जिल्हास्तरिय निबंध स्पर्धेचा निकाल जाहिर

**दै.रायगड नगरी । उरण**

नेहरु युवा केंद्र– अलिबाग ( भारत सरकार ) महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान– पाणदिवे आणि वटवृक्ष सामाजिक संस्था– उलवेयांच्या संयुक्त विद्यमाने १२ जानेवारी स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधुन आयोजित केलेल्या पाणी या विषयावरीलरायगड जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे .

या निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ. विद्या किशोर संभेराव रा. उलवे, द्वितीय क्रमांक श्री. चंद्रशेखर जगन्नाथ म्हात्रेरा. पनवेल तर तृतीय क्रमांक अभिषेक शोभा सुरेश पाटील धाकटा खांदा (पनवेल ) या स्पर्धकांनी पटकविले. खुल्या गटातील निबंध स्पर्धेत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातुन अनेक सहभागी झाल्याने चुरस वाढली.

त्यामुळे आणखी तीन स्पर्धकांना उत्तेजनार्थ क्रमांक काढण्यात आले.

त्या उत्तेजनार्थ म्हणुन कोमल पोपट हजारे– नविन पनवेल, विशाखा रमेश देगाव– अलिबाग, साहिल प्रमोद थळे– अलिबाग ह्या स्पर्धकांची निवड करण्यात आली. लवकर पारितोषिक वितरण होईल, तर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र ५ फेब्रुवारी पासुन वाटप करण्यात येतील, असे स्पर्धेचे मुख्य आयोजक मनोज पाटील आणि किरण मढवी यांच्या वतीने सांगण्यात आले. ही निबंध स्पर्धा यशस्वी होण्यासाठी राज्य आदर्शशिक्षक पुरस्कार विजेते विद्याधर गोपीनाथ पाटील, सुनील रामदास गावंड, सौ. स्नेहल देवदत्त पाटील आणि सौ विशाखा विश्वनाथ गावंड आदी शिक्षकांनी सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.

# बोर्ली स्टँडवर खड्डे बुजविण्यात आले ; सार्वजनिक बांधकाम खात्याने घेतली दखल

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या अनेक दिवसांपासून साळाव–मुरुड रस्त्यावर बोर्ली स्टँडनजीक रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य असून याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष असल्याबाबत वाहनचालक व नागरिकांतून नाराजी व्यक्त होत असल्याचे वृत्त प्रसिद्ध होताच सार्वजनिक बांधकाम खात्याने दखल घेऊन याठिकाणी खड्डे बुजविण्यात आल्याने वाहनचालक व प्रवासीवर्गातून समाधान व्यक्त होत आहे.



साळाव–मुरुड रस्त्यावर बोर्ली स्टँडनजीक एक रस्ता मांडला, काकळघर कडे तर दुसरा मुरुड कडे जातो. याठिकाणी कित्येक दिवसांपासून खाच–खळगे व खड्डे पडले असून वाहनचालक व स्थानिक नागरिकांना त्रास व हाल सहन करावे लागत होते. मागील आठवड्यात दोन तीन दिवस पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे रस्त्याच्या दुरावस्थेत भर पडली होती. याबाबत वृत्त पत्रातूनही वृत्त देण्यात आले होते.

शासनाच्या संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकारी वर्गाने यात लक्ष पुरवून बोर्ली स्टँडनजीक रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आल्याने वाहनचालक व प्रवासीवर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**



दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


# म्हसळा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे २३ जानेवारी रोजी लोकार्पण

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पंचायत राज ३१ सहाय्यक अनुदाने २५/१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत २०१४ मध्ये मंजुर झालेल्या सुमारे दोन कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या पंचायत समिती कार्यालय म्हसळा नवीन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा शनिवार दिनांक २३ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता इमारतीच्या प्रांगणात राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री ना.हसन मुश्रीफ यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

लोकसभा खासदार सुनिल तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमात विशेष अतिथी पालकमंत्री ना.आदिती तटकरे, ग्रामविकास राज्यमंत्री ना. अब्दुल सत्तार उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख अतिथी म्हणुन विधान परिषद सदस्य अनिकेत तटकरे, राजीप अध्यक्षा योगिता पारधी, उपाध्यक्ष सुधाकर घारे, अर्थ व बांधकाम सभापती निलिमा पाटील, कृषी सभापती बबन मनवे, महिला व बालकल्याण सभापती गीता जाधव, जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी, मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, राजीप सदस्या धनश्री पाटील, नगराध्यक्षा जयश्री कापरे, उपनगराध्यक्ष सुहेब हळदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे जाहीर निमंत्रण गटविकास अधिकारी वाय.एम. प्रभे यांनी दिले आहे.

# कोप्रोली ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी निरज पाटील यांची निवड

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

शिवसेनेचे युवा नेते तथा कोप्रोली ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य निरज पाटील यांची नुकताच कोप्रोली ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी निवड झाल्याने शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर तसेच सरपंच सौ अलका सतिश म्हात्रे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

कोप्रोली गावातील जनतेच्या समस्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असा विश्वास नवनिर्वाचित उपसरपंच निरज पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष निर्भय म्हात्रे, कार्याध्यक्ष बबन पाटील, शिक्षक सेनेचे तालुकाध्यक्ष रमणिक पाटील, नरेश मोकाशी, सामाजिक कार्यकर्ते सतिश म्हात्रे तसेच गाव परिसरातील पदाधिकारी कार्यकर्ते, ग्रामस्थ यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे शनिवार, दि.२३ जानेवारी २०२१ रोजी, सकाळी ७.४५ वा. शासकीय निवासस्थान बी–५,मुंबई येथून मोटारीने गेट वे ऑफ इंडियाकडे प्रयाण. सकाळी ८.०० वा. गेट वे ऑफ इंडिया येथे आगमन व स्पीड बोटने मांडवाकडे प्रयाण. ८.३० वा. मांडवा येथे आगमन व इंदापूर ता.माणगावकडे प्रयाण. सकाळी १०.३० वा. शेखरशेठ देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. स्थळ : इंदापूर ता.माणगाव. सकाळी १०.४५ इंदापूर येथून शासकीय विश्रामगृह म्हसळाकडे प्रयाण. सकाळी ११.३० वा. शासकीय विश्रामगृह म्हसळा येथे आगमन. सकाळी ११.३० वा पंचायत समिती कार्यालय, म्हसळा, नवीन प्रशासकीय इमारतीचा उद्घाटन सोहळा. स्थळ : नवीन प्रशासकीय पंचायत समिती कार्यालय, म्हसळा. दुपारी १.३० वा. राखीव. नझीम हसवारे यांच्या निवासस्थानी. दुपारी २.३० वा. शासकीय विश्रामगृह म्हसळा येथून शासकीय वाहनाने मांडवाकडे प्रयाण. सायं.५.३० वा. मांडवा येथून स्पीड बोटने गेट वे ऑफ इंडिया, मुंबईकडे प्रयाण.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## जेएनपीटीने सिडकोबरोबर केला सामंजस्य करार

सुविधा व पायाभूत सुविधांचा विकास केला जाईल. सिडको केलेल्या कामाचे प्रत्यक्ष उपयोगिता प्रमाणपत्र जेएनपीटीला देईल व त्या आधारे जेएनपीटी सिडकोला हप्त्यांमध्ये निधी निर्गमित करेल. या करारामध्ये हे देखील मान्य केले गेले आहे.

की जोपर्यंत पायाभूत सुविधा स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित केल्या जात नाहीत, तोपर्यंत सिडको त्या भागासाठी एक विशेष नियोजन प्राधिकरण असेल आणि पायाभूत सुविधांच्या देखभालीचा खर्च सिडकोद्वारा करण्यात घेईल. या प्रकल्पासाठी जेएनपीटी वित्तपुरवठा करीत असल्याने महाराष्ट्र शासनाने हा सामंजस्य करार कार्यान्वित करण्याची जबाबदारी सिडकोला दिली असून सिडको प्रकल्पग्रस्तांकडून विकास शुल्क वसूल करून जेएनपीटीला देईल.

साडेबारा टक्के भूखंड वाटप पारदर्शकपणे करण्यात आले आहे. भूखंड वाटपासाठी सिड़कोने जेएनपीटीच्या सहकार्याने संगणकीकृत लॉटरी प्रणालीद्वारे पाच ड्रॉ काढण्यात आले असून आतापर्यंत ५२ टक्के प्रकल्पग्रस्तांना सिडकोने हेतू पत्र दिले आहेत. जेएनपीटीला ठाम विश्वास आहे की उर्वरित ४८ टक्के प्रकल्पग्रस्त सुद्धा लवकरच यामध्ये भाग घेतील.

## रुग्णालयांचे १५ दिवसात हेल्थ ऑडीट करणार

या कक्षाची जबाबदारी असलेल्या वैद्यकीय अधिकारी, नर्स आणि त्यांच्यावर पर्यवेक्षणाची जबाबदारी असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर निलंबन आणि सेवा समाप्तीची कारवाई करण्यात आली आहे. भंडारा जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रमोद खंडाते यांना निलंबित, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुनिला बडे यांची अकार्यकारी पदावर बदली, वैद्यकीय अधिकारी डॉ.अर्चना मेश्राम यांच्यावर निलंबनाची, परिसेविका ज्योती भारसकर यांच्यावर निलंबनाची तर कंत्राटी अधिपरिसेविका स्मिता आंबिलडुके आणि शुभांगी साठवणे यांच्यावर सेवा समाप्तीची कंत्राटी बालरोग तज्ज्ञ डॉ.सुशिल अंबादे यांच्यावर सेवा समाप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

## २२ ग्रामपंचायतींवर असेल महिला राज

आहेत. प्रांताधिकारी अमित शेडगे यांच्या अध्यक्षतेखाली हि आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी तहसीलदार सचिन गोसावी सभापती बाबुराव चोरगे तसेच विविध पक्षाचे प्रतिनिधी व ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामपंचायतीचे आरक्षण पुढीलप्रमाणे सर्वसाधारण महिलांसाठी असणाऱ्या कारिवणे, गुळधे, वाळवटीं, सर्वे, सायगाव, साखारोने, दांडगुरी, वडघर, निगडी, हरीहरेश्वर, वडवली, शिस्ते तर सर्वसाधारण वर्गातून कोलमांडला, रानावली, कुडगाव, शेखाडी, हरवीत, गानीक, खुजारे, बोर्लीपंचतन, गौळवाड़ी आणि भोस्ते येथे सरपंच असणार आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी स्त्री वर्गातून गाळसुरे, कुडकी, चिखलप, भरडखोल, दांडा आणि कळींजे ह्या गावांचे सरपंच पद राखीव झाले आहे. तर दिघी, दिवेआगर, मेघरे, वांजळे, खारगाव, नागलोली याठिकाणी नामप्र वर्गानुसार सरपंच असेल. तसेच आदगाव, जसवली, आराठी, मारळ, वेळास, वाकलघर आणि बागमांडला ह्या ग्राम पंचायतीचे सरपंच पद हे अनुसूचित जातीसाठी राखीव झाले आहे. महत्वाचे म्हणजे वाकलघर, बागमांडला, आराठी आणि वेळास येथे स्त्री अनुसूचित जातींसाठी राखीव आहे.

## १२ ठिकाणी महिला सरपंच विराजमान होणार

बहुतेक ग्रामपंचायतीत ना.मा.प्र. महिला, सर्वसाधारण महिला असेच आरक्षण पडले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या २१ ग्रामपंचायती सरपंच आरक्षणासह २०२५ साठीच्या धाटाव, आंबेवाडी, नागोठणे, मेढा, पिगोंडा, चणेरा, किल्ला, खारगांव, पिंगळसई अशा सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच आरक्षण जाहीर झाले. त्यात प्रामूख्याने धाटाव ग्रामपंचायतीसाठी सर्वसाधारण आरक्षण पडले. आरक्षण सोडतीत प्रामुख्याने महिला राज कारभारावर शिक्कामोर्तब झाले. अवघ्या तालुक्याचे लक्ष लागलेल्या आणि सर्वाधीक महत्वाची लढत झालेल्या कॉंग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष सुरेश मगर गट विरूध्द राष्ट्रवादी कॉंग्रेस लढतीत सर्वच्या सर्व ९ जागांवर सुरेश मगर गटाने बाजी मारली होती. तालुक्यात आणि धाटाव पंचक्रोशीत प्राबल्य असलेल्या राष्ट्रवादी पक्षाला हा खूप मोठा झटका मानला जात होता. मात्र सरपंच आरक्षण अनु जमाती महिला जाहीर झाल्याने सुरेश मगर यांचे पुतणे अरविंद मगर यांची सरपंचपदाची संधी हुकली आहे. रोठ खुर्द मध्ये सर्वसाधारण महिला आरक्षणाने दिनेश मोरे गटाला रोखून धरलेल्या जनार्दन मोरे यांचेही स्वप्न अधुरे राहिले आहे. कही खुशी, कही गम असेच सरपंच आरक्षण अनेक इच्छुकांसाठी ठरले आहे. सर्वसाधारण सरपंच आरक्षण पडल्याने रोठ खुर्द मध्ये अमित घाग यांचा मार्ग मोकळा झाला आहे. गोवेत सरपंच पदासाठी महेंद्र पोटफोडे, घोसाळेत पुन्हा प्रतिभा पार्टे यांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार असल्याचे समजते आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ट्रान्सपोर्ट, माथाडी व जनरल कामगार सेनेच्या रायगड जिल्हा अध्यक्षपदी मंगेश डफळे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

शिवसेनाप्रणीत हिंदुस्तान ट्रान्सपोर्ट, माथाडी व जनरल कामगार सेनेच्या रायगड जिल्हा अध्यक्षपदी मंगेश डफळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मंगेश डफळे अनेक दिवसांपासून शिवसेनेमध्ये कार्यरत आहेत. दादर येथे शिवसेना भवन या शिवसेनेच्या मुख्यालयात झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमांमध्ये शिवसेना पश्चिम महाराष्ट्र समन्वयक मा. आ. दगडू सपकाळ यांच्या हस्ते मंगेश डफळे यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्र माथाडी व ट्रांसपोर्ट जनरल कामगार सेनेचे अध्यक्ष विकास मयेकर देखील उपस्थित होते. तसेच उत्तर कराड शिवसेना विभागीय समन्वयक शंकर सकपाळ हेदेखील उपस्थित होते. जावळी विधानसभा क्षेत्राचे शिवसेना समन्वयक एकनाथ ओंबळे, त्याचप्रमाणे युनिव्हर्सल ह्यूमन राइट कौन्सिलचे अध्यक्ष जितेंद्र दगडू सकपाळ हेदेखील उपस्थित होते.

मंगेश डफळे यांची रायगड जिल्हा अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल अनेक मान्यवरांनी त्यांचे भ्रमणध्वनी द्वारे व प्रत्यक्ष भेटून अभिनंदन केले आहे.

## शेळ्यांमेंढ्याची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलजवळील मुंबईहुन पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एक्स्प्रेस महामार्गावरून बेकायदेशीर रित्या शेळ्यांमेंढ्याना वाहनात क्षमतेपेक्षा जास्त भरून वाहतूक करणाऱ्या चौकडी विरुद्ध पनवेल तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

अशोक लेलँड ट्रकमध्ये आरोपी हुसेन अब्दुल शेख (वय ३५), मेहबूब सळुमिया शेख (वय ५५), कमरुद्दीन रियाजुदन पठाण (वय ५२) आणि फिरोज इमताहुसेन सय्यद (वय ३०) हे १८५ शेळ्यांमेंढ्याची वाहतुक करीत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा ट्रक ताब्यात घेतला असून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अर्जदारातर्फे वकील
ॲड.प्रदीप तु.मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.४५/२०२१

श्री.रोहिदास चंद्रकांत गोंधळी
वय : ४४ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.मोठा खांदा, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.उप आयुक्त / जन्म व मृत्यू नोंदणी अधिकारी
पनवेल शहर महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी कै.जोमीबाई चंद्रकांत गोंधळी रा.मोठा खांदा, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून त्यांचा मृत्यू दि.१२/०३/१९९८ रोजी झालेला असून त्यांच्या मृत्यूची नोंद पनवेल शहर महानगरपालिका, पनवेल यांच्या कार्यालयात करण्यात आलेली नाही. त्या कारणाने अर्जदार यांनी मे.न्यायालयात क्रिमिनल चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

तसेच कै.जोमीबाई चंद्रकांत गोंधळी यांच्या मृत्यूचा दाखला देण्याबाबत ज्या कुणाच्या हरकती असतील त्या हरकती सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत सदर न्यायालयात लेखी कळवाव्यात, तसे न केल्यास सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२१/०१/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.२७४/२०२०

श्रीमती.सुगराबी हसन तांबोळी
लग्नानंतरचे नाव सुगराबी अब्दुल सत्तार तांबोळी
वय : ६६, व्यवसाय : गृहिणी
राहणार : १९.१४० बी आईटी चालू
सुफिया जुबेर रोड नागपाडा पोलीस स्टेशनजवळ
नागपाडा मुंबई, मुंबई सेंट्रल मुंबई ४००००८ — अर्जदार
विरुद्ध
जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार स्वतः श्रीमती. सुगराबी हसन तांबोळी लग्नानंतरचे नाव सुगराबी अब्दुल सत्तार तांबोळी यांचा जन्म दिनांक ०४/०६/१९५३ रोजी राहत्या घरी पटेल मोहल्ला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झाला होता. अर्जदार यांचे श्रीमती.सुगराबी हसन तांबोळी यांची जन्माची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू श्रीमती.सुगराबी हसन तांबोळी या वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे. या संदर्भात कोणालाही काही सांगायाचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि.२१/०१/२०२१ रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर,पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर,पनवेल

# मुंबई - पुणे महामार्गावर रस्ता सुरक्षा अभियानाची जोरदार सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सडक सुरक्षा जीवन रक्षा ' हे ब्रीदवाक्य घेवून महामार्ग पोलीस मदत केंद्र पळस्पे यांचे वतीने ३२ वा रस्ता सुरक्षा अभियान -२०२१ चे आयोजन करण्यात आले होते . सदर अभियान दि १८ जानेवारी २०२१ ते १७ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत राबविले जाणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिताताई पारधी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमास महामार्ग पोलीस रायगड परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, रायगड विभागाचे पोलीस उप अधीक्षक संदीप भागडीकर, महामार्ग पोलीस रायगड विभागाचे पोलीस निरीक्षक सुदाम पाचोरकर, प्रसिदध उदयोजक सल्लाउददीन खान व वैष्णव मुंदे तसेच महाराष्ट्र वाहतूक सेनेचे अध्यक्ष उदय दळवी व कार्याध्यक्ष अशोक टावरे, अपघातग्रस्त संघटनेचे गुरुनाथ साठेलकर तसेच इतर अनेक मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते. महामार्गावर प्रवास करत असतांना प्रवाशांचे, सामान्य माणसांचे जीवन सुरक्षित रहावे, त्यांचा प्रवास सुखकर व्हावा याकरीता ३२ व्या रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले.



सदर अभियान कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना महामार्ग पोलीस केंद्राचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी म्हणाले की, रात्रं - दिवस द्रुतगती महामार्गवर प्रवास करणारे लोकांचा प्रवास सुरक्षित व्हावा म्हणून द्रुतगती महामार्गवरील सर्व वाहतूक पोलीस अधिकारी / अंमलदार सतर्क असतात. कोरोना काळातही वाहतुक विभागाचे आमचे टिमने अतिशय उत्तम कामगिरी बजावल्यामुळे या द्रुतगती महामार्गावरील अपघातांचे प्रमाण ४० टक्क्यांनी कमी झाले आहे. महामार्ग पोलीस पथक , महाराष्ट्र राज्य येथील वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांचे पालन करीत, प्रवाशांच्या जीवांचे रक्षण करण्यासाठी व त्यांचा प्रवास सुखकर होणेकरीता महामार्ग वाहतुक पोलीस विभाग सदैव तत्पर आहे व राहील. यानंतर कार्यक्रमाचे उदघाटक रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा कु योगिताताई पारधी म्हणाल्या, आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येकाला यशस्वी व्हायच आहे, पण ही स्पर्धा जीवघेणी असता कामा नये. आपल्याला वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करत आपला महामार्गावरील प्रवास सुखकर करायचा आहे. आपल्याला कोणत्याही चुकीमुळे आपण कुटुंबाला दुःखात लोटायचे नाही तर दुचाकी चालविताना हेल्मेट, चारचाकी चालविताना सिटबेल्ट, अतीस्पिड, ओव्हरटेक करणे टाळले पाहिजे व आपण आपले जिवन सुखकर बनवुया, असे सांगत महामार्ग विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच महामार्ग पोलीसांचे मनोबल उंचावत मन:पुर्वक आभार मानले व शुभेच्छा दिल्या . रायगड परिक्षेत्रचे महामार्ग पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी सांगितले कि, आज कोरोना महामारीत महामार्ग पोलीस विभाग २४ तास सदैव प्रवाशांच्या सेवेत महामार्गावरील वाहतुकीचे नियमन करुन प्रवास सुखकर व्हावा म्हणुन धडपडत राहिला आहे. पुर्वीच्या तुलनेत अत्याधुनिक प्रगत तंत्रज्ञानामुळे ओव्हरस्पीड, लेन कटिंग, यासारख्या अनेक गोष्टींना आळा बसुन अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. भविष्यातही आपल्याला स्वत : बरोबर इतरांच्या जीवाची काळजी घेत सुरक्षित व सुखकर प्रवास करण्याची प्रतिज्ञा प्रत्येकाने करणे काळाची गरज असल्याचे सांगितले व सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाप्रसंगी महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांच्या हस्ते रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा कु. योगिताताई पारधी यांचे शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन यथोचित स्वागत करण्यात आले. तसेच पोलीस अधीक्षक संजय बारकुंड साहेब तसेच पोलीस उप अधीक्षक संदीप भागडीकर त्याचप्रमाणे उदय दळवी, अध्यक्ष महाराष्ट्र वाहतुक सेना यांचेही स्वागत करण्यात आले. सदर कार्यक्रमास जनता विद्यालय आजिवलीचे प्राचार्य, शिक्षक वृंद व विदयार्थी उपस्थित होते. तसेच नवकार लॉजीस्टीकचे वाहनचालक तसेच महाराष्ट्र वाहतुक सेनेचे पदाधिकारी, परिसरातील ग्रामस्थ मंडळी, अपघातग्रस्तांसाठी मदत करणारी संघटना तसेच देवदुत टिम ही सर्व मंडळी उपस्थित होती. यावेळी महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेचे कोरोना वॉरीयर्स अंमलदार अपघातग्रस्तांना मदत करणारे सामाजिक संस्थेचे सदस्य, देवदुत कर्मचारी, आय.आर.बी. कर्मचारी तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलचे कर्मचारी यांचा यावेळी शाल पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देवुन सत्कार १ करण्यात आला. या रस्ता सुरक्षा अभियानामध्ये पनवेल विभागाचे महामार्ग पोलीस निरीक्षक सुदाम पाचोरकर साहेबांनी उपस्थित मान्यवरांचे मन : पुर्वक आभार मानले व या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भिंगार शाळेचे शिक्षक तानाजी भोसले सर यांनी केले.

## रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत कोलाड वाहतूक शाखेने केले उत्कृष्ट मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत कोलाड नाक्यावर कोलाड वाहतूक शाखेने रिक्षाचालक तसेच उपस्थित असंख्य वाहन चालकांना अत्यंत सोप्या भाषेत उत्कृष्ट मार्गदर्शन केले. आपल्या जवळील वाहन शिस्तीने कसे चालवावे वाहनाची गती किती असावी, रस्त्याने जाणाऱ्या प्रवाशांची इतर वाहनांनी वाहन चालवताना विशेष काळजी कशी घ्यावी. ओव्हर टेक करू नये, स्वतःचा आणि इतरांचा अमूल्य जीव कसा सुरक्षित ठेवावा याविषयी मार्गदर्शन जिल्हा वाहतूक शाखा अलिबागचे पोलीस निरीक्षक श्री रविंद्र शिंदे, कोलाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सुभाष जाधव, आर एस पी अधिकारी श्री फिरोज सय्यद, आंबेवाडी सरपंच सुरेशदादा महाबळे, तसेच मंगेश पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी चार-चाकी वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले. यावेळी पोलीस हवालदार पी आर देशमुख, पोलीस हवालदार एमडी पाटील, सहाय्यक फौजदार विद्या पाटील, पोलीस हवालदार श्री केरकर तसेच जिल्हा शाखा कोलाडचे सर्व अधिकारी उपस्थित होते. कोविड काळात ही कोलाड पोलिस ठाण्याच्या सर्व कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे होते. तसेच आरएसपी अधिकारी फिरोज सय्यद, संतोष पाटील तसेच अन्य अधिकारी वर्गाने सुद्धा जीवाची पर्वा न करता चांगली सेवा केली.

## कंटेनरच्या धडकेने इसम जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका भरधाव कंटेनरने पादचारी इसमास धडक दिल्याने झालेल्या अपघातात सदर इसम जखमी झाला आहे.

पनवेल जवळील कसळखंड येथे नवकार लॉजीस्टिक या ठिकाणी सत्यवान शिंदे हे लघुशंकेसाठी गाडीच्या उजव्या बाजूने उतरत असताना तेथून जात असल्याने कंटेनरच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन घाईघाईने चालवून सत्यवान शिंदे यास धडक दिली व त्यामध्ये ते जखमी झाले. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

मा.बहिर साहेब
ॲड.हेमा एस.भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, पनवेल
चौ.अर्ज क्र.१०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०३/२०२१

१) श्रीमती.स्वाती अरुण कल्याणकर
वय : ४३ वर्षे
२) श्री.साहिल अरुण कल्याणकर
वय : १६ वर्षे
दोघेही राहणार वास्तूशांती टॉवर
बिल्डींग नं.१२, सेक्टर ११, कळंबोली — अर्जदार

कै.अरुण नारायण कल्याणकर व अर्जदार क्र.१ यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

के.एल.६, बिल्डींग नं.३, रुम नं.१०, सेक्टर ३ ई, कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल एकूण किंमत रु.१९,००,०००/-
अर्धा हिस्सा ९,५०,०००/-

वरील अर्जदार क्र.१ ह्या कै.अरुण नारायण कल्याणकर यांच्या पत्नी आहेत व २ हा त्यांचा मुलगा. कै.अरुण नारायण कल्याणकर यांचे निधन दि.१८/०१/२०१५ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल वाशी येथे झाले आहे. कै.अरुण नारायण कल्याणकर यांच्या निधनाची नोंद नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये केलेली आहे व नवी मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे. वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/१/२०२१ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया, पनवेल

## चोंढी महाविद्यालयात एड्स जनजागृती व रक्तदान शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरीकोर्लई**

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या वरीष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना,रेडरिबन क्लब, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने चोंढी महाविद्यालयात एच.आय.व्ही. (एड्स) जनजागृती व रक्तदान शिबीर नुकतेच आयोजित करण्यात आले.



लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड.प्रवीण ठाकूर, उपाध्यक्ष प्रमोद पाटील, कार्यवाह रविंद्र ठाकूर, सहकार्यवाह संजय शिंदे, खजीनदार शाम काठे, सदस्य गणेश आमले, केशव चांदोरकर, महेश पडते, जगन्नाथ महाले, मनोहर म्हात्रे, प्रकाश पाटील, मुख्याध्यापिका कामिनी राऊत, जिल्हा रुग्णालय डॉ.दिपक गोसावी, समुपदेशक कल्पना गाडे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अमित सोनावणे यांसह जिल्हा रक्तपेढी तील टिम यावेळी उपस्थित होती. महाविद्यालय प्राचार्या लिना पाटील यांनी स्वयंसेवकांना रक्तदानाचे महत्त्व विषद करून सांगितले तर जिल्हा रुग्णालय समुपदेशक कल्पना गाडे यांनी एड्स बाबत सविस्तर माहिती देऊन जनजागृती केली. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना, रेडरिबन क्लब स्वयंसेवक तसेच आजी माजी विद्यार्थी यांसह प्रितिजा कोटीयन, प्रा.प्रांजली पडते, सौ.वाघे, सौ.चिंबूलकर मॅडम यांसह सत्तर रक्तदात्यांनी स्वयंस्फुर्ततेने सहभाग घेऊन रक्तदान केले. कार्यक्रम अधिकारी श्रद्धा पाटील, प्रा.प्रांजली पडते, वैद्यकीय अधिकारी डॉ.दिपक गोसावी, कर्मचारी केतन केतकर, तेजल भगत यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

## परदेशात नोकरीच्या आमिषाने महिलेची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

परदेशात नोकरीला लावतो असे सांगत तिचा विश्वास संपादन करून तिची ऑनलाईन फसवणूक केल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे. प्रतिमा दुबे (वय ४२, राहणार -नेरे) यांनी परदेशात नोकरी मिळण्यासाठी वेगवेगळ्या संस्थेमध्ये वैयक्तिक माहिती ऑनलाईन दिलेली होती. त्याप्रमाणे आरोपी सुनील मिश्रा (वय२८) व विशाल कोचार (वय ३२) यांनी तिला फोन करून तुम्हाला परदेशात नोकरी देतो असे सांगून तिचा विश्वास संपादन करून तिला ऑनलाईन बँकिंग द्वारे ६२ हजार १७७ रुपये भरण्यास सांगितले, व ते भरल्यानंतरही नोकरी न लागल्याने आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले.

ॲड.दिनानाथ कै.सोनकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज वरिष्ठ स्तर मुजावर साहेब यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.८१९/२०२०
नि.नं.८
ने.ता.१०/०३/२०२१

१) श्रीमती.वृंदावनी हरिश्चंद्र देटे
वय : ४० वर्षे, व्यवसाय : घरकाम
२) श्री.सौरभ हरिश्चंद्र देटे
वय : २१ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) श्री.संकेत हरिश्चंद्र देटे
वय : १९ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.बि ५, २०१, पूर्वा सिल्व्हर सॅण्डस
सर्व्हे नं.९/१४, ऑक्सफर्ड प्रोजेक्ट जवळ,
केशव नगर, मुंढवा, पुणे ४११०३६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार नं.१) श्रीमती.वृंदावनी हरिश्चंद्र देटे, २) श्री.सौरभ हरिश्चंद्र देटे, ३) श्री.संकेत हरिश्चंद्र देटे सर्व रा.बि ५, २०१, पूर्वा सिल्वर सॅण्डस सर्व्हे नं.९/१४, ऑक्सफर्ड प्रोजेक्ट जवळ, केशव नगर, मुंढवा, पुणे-४११०३६

अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ३ यांचे वडील स्व.हरिश्चंद्र किसनराव देटे हे दि.१७/०२/२०२० रोजी मौजे : चाकण महाराष्ट्र येथे मयत झाले असून सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन
सदनिका नं.डी-१/बी/२:१, साई अपार्टमेंटस ओनर्स को.ऑ.हौ. सोसायटी लि.सेक्टर नं.८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम), तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड क्षेत्र ४१.०३ स्क्वे. मीटर
बिल्टअप एकूण किंमत रु.३,२७,०००/-
(रुपये तीन लाख सत्तावीस हजार फक्त)

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

तरी वरील हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/१/२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

राव साहेब
ॲड.अजित धनराज म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.८५५/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०३/२०२१

१) श्रीमती.इंदिरा संजय ठाकूर
वय : ४५, धंदा : गृहिणी
२) कु.अपूर्वा संजय ठाकूर
वय : २२, धंदा : काहीनाही
३) कु.प्राची संजय ठाकूर
वय : १४, धंदा : शिक्षण
४) कु.प्राप्ती संजय ठाकूर
वय : ११, धंदा : शिक्षण
रा.शिवाजीनगर, पो.गव्हाण,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
५) सौ.निता गोवर्धन म्हात्रे
वय : २४, धंदा : गृहिणी
रा.एकटघर, तालुका : उरण, जिल्हा : रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील कै.संजय गोसाय ठाकूर हे दिनांक २९/०८/२०२० रोजी मौजे : शिवाजीनगर, पो.गव्हाण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची आई कै.बयोबाई गोसाय ठाकूर ह्या दि.१४/१०/२०११ रोजी मौजे : शिवाजीनगर, पो.गव्हाण, ताालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.संजय गोसाय ठाकूर यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

मिळकतीचे वर्णन
मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
मौजे : सिडको फाईल नं.उलवे-३६५

| मौजे | युनिट केस नं. | अवॉर्ड नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| गव्हाण | ५५१ | १५१ | ५५ | ८ | ०-५३-३ |
| | | | ४९ | १ | ०-३६-८ |
| | | | ४३ | १ | ०-१७-७ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अवॉर्ड हा कै.संजय गोसाय ठाकूर यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.संजय गोसाय ठाकूर यांचे वारसदार या नात्याने कै.संजय गोसाय ठाकूर यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या. व. स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.संजय गोसाय ठाकूर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २१/०१/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## आंबेवाडी नाक्यावरील विविध कामांचे खा.सुनिल तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

२६ जानेवारी २०२१ रोजी आंबेवाडी नाक्यावरील पाणपोई, अंगणवाडी इमारत, ज्येष्ठ नागरिक सभागृह, ग्रामसेवक कॉटर्स आदींचा उद्घाटन सोहळा खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते होणार असून यावेळी आमदार अनिकेत तटकरे, पालकमंत्री आदितीताई तटकरे हे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी इलेक्ट्रिकल डिप्लोमा मध्ये महाराष्ट्रात प्रथम आलेल्या साक्षी बाबू बटावले हिचा जाहीर सत्कार करण्यात येणार असून दिनांक २६ जानेवारी २०२१ रोजी सायंकाळी पाच वाजता आंबेवाडी नाका येथे सदरील कार्यक्रम संपन्न होणार असल्याचे आंबेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच सर्व सुरेश दादा महाबळे तसेच सर्व सदस्य यांनी कळविले आहे. कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आव-हन आंबेवाडी ग्रामपंचायती मार्फत करण्यात आले आहे.

## श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर पडलेली सुरुची झाडे, वनविभागाचे वरातीमागून घोडे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

तीन जून रोजी श्रीवर्धन शहरासह तालुक्याला निसर्ग चक्रीवादळाने जोरदार तडाखा दिला. यामध्ये श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर असलेली असंख्य सुरुची झाडे बुंधापासून उपटुन गेली तर काही अर्ध्या वरून मोडून पडली आहेत. श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरील सुरुची झाडे वादळात नष्ट झाल्यामुळे श्रीवर्धनचा समुद्रकिनारा दिसायला काही प्रमाणात विद्रुप वाटु लागला आहे. कारण समुद्रकिनार्यावरती वनखात्याच्या जागेत असलेल्या सुरूच्या झाडांमुळे श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याचे सौंदर्य चांगलेच खुलत होते. तसेच येणाऱ्या पर्यटकांना व स्थानिक नागरिकांना देखील बसण्यासाठी चांगल्या प्रकारे सावली उपलब्ध होत होती.

वादळ होऊन गेल्यानंतर सदर सुरुची झाडे व लाकडे उचलण्यासाठी वनविभागाने तातडीने जाहीर निविदा काढणे अपेक्षित होते. परंतु वनविभागाने असे न करता तब्बल सात महिन्याच्या कालावधीनंतर आज या ठिकाणी मजूर लावून झाडे उचलण्यास प्रारंभ केला आहे. वादळानंतर काही स्थानिक नागरिकांनी देखील पडलेली झाडे सरपणासाठी उचलून नेली. तर काही ठिकाणची मोठी मोठी झाडे देखील चोरीला गेली. वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना खासदार सुनील तटकरे व पालकमंत्री आदिती तटकरे यांनी लवकरात लवकर निविदा काढून सदरची झाडे उचलण्यासाठी प्रयत्न करावेत अशा प्रकारच्या सूचना श्रीवर्धन प्रांत कार्यालयात झालेल्या बैठकीत देण्यात आल्या होत्या. परंतु सदर लाकडे आता सात महिने उलटून गेल्यानंतर पावसाच्या पाण्यामध्ये पूर्णपणे भिजून गेलेली आहेत. सात महिन्यानंतर लाकडे उचलण्यासाठी व कापण्यासाठी मजुर पाठवणे म्हणजे वनविभागाचे वरातीमागून घोडे नाचविण्याचा प्रकार असल्याचे बोलले जात आहे. सदरची लाकडे उचलल्यानंतर पावसाळ्यात या ठिकाणी नवीन सुरूच्या झाडांची लागवड करावी अशी मागणी स्थानिकांनी नागरिकांमधून केली जात आहे.

# पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राचे भूमिपुजनानंतर १२ वर्षांनंतर उदघाटन

## २००२ पासून पळचिल प्राथमिक शाळेमध्ये सुरु आहे आरोग्य केंद्र

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात असलेल्या पळचिल गावामध्ये चक्क रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या इमारतीमध्ये गेली १९ वर्षे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू आहे. यालगतच या प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन सुसज्ज इमारत बांधण्यासाठी २००९ रोजी तत्कालीन पालकमंत्री सुनील तटकरे यांच्याहस्ते भूमिपुजन होऊन उभारलेल्या इमारतीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरीत न झाल्याने नवीन इमारतीचा आता वापर न होताच जिर्णोध्दार करण्यात आल्यानंतर आज शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१ रोजी दुपारी २ वाजता अधिकृतरित्या पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राचे उदघाटन होणार आहे. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली राज्याचे आरोग्यमंत्री ना.राजेश टोपे आणि राजिप अध्यक्ष योगिता पारधी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उदघाटनाचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे भूमिपुजन खा.तटकरे पालकमंत्री असताना झाले होते तर आता तब्बल १२ वर्षांनी त्यांच्या सुकन्या ना.अदिती तटकरे पालकमंत्री झाल्यानंतर त्यांच्याहस्ते उदघाटन होत असल्याने सरकारी काम १२ वर्षे थांब,



असा प्रत्यय पोलादपूरवासियांना आला आहे.

स्व.प्रभाकर मोरे हे २००२ दरम्यान महाड विधानसभा मतदार संघाचे विरोधी पक्षाचे आम दार असताना पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाच्या आवारातून प्राथमिक आरोग्य केंद्राचे स्थलांतरण रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील पळचिल येथे होऊन रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या इमारतीतील दोन खोल्यांमध्ये रूग्णसेवा सुरू झाली. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत दि. २७ फेब्रुवारी २००९ रोजी पळचिल येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नियोजित इमारतीचे बांधकाम मंजूर करण्यात आल्यानंतर महाड विधानसभा मतदार संघाचे तत्कालीन आमदार माणिकराव जगताप यांच्या उपस्थितीत तत्कालीन रायगडचे पालकमंत्री सुनील तटकरे यांनी भूमिपूजन केले. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणाच्या मागणीसाठी १६ डिसेंबर २०१३ रोजी झालेल्या कोकणातील पत्रकारांच्या कशेडी घाट रोको आंदोलनास पाठिंबा दर्शविण्यासाठी आवर्जून आलेले रायगड जिल्हा परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष सुभाष प्रभाकर उर्फ पंडीतशेठ पाटील यांनी या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नियोजित इमारतीच्या बांधकामाची पाहाणी करून हे काम अतिशय मंद गतीने सुरू असल्याबद्दल नाराजीही व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास आणि जलसंधारण विभागामार्फत रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विस्तारीकरण करणे तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी तीन निवासस्थाने बांधणे या कामासाठी ३६ लाख ४० हजार ९०५ रूपयांच्या खर्चाला प्रशासकीय मंजूरी दिल्याने प्राथमिक शाळेतील प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत होण्याऐवजी नवीन काम सुरू झाले. यानंतर या कामाची पूर्तता होऊन प्रथमच पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत आता वापरण्यायोग्य झाली असून या नवीन इमारतीमध्ये तब्बल २१ वर्षांनंतर आरोग्यसेवा सुरू होत आहे.

या उदघाटन सोहळ्याला रायगडचे खासदार सुनील तटकरे, विधान परिषद सदस्य सर्वश्री जयंत पाटील, अनिकेत तटकरे, निरंजन डावखरे, बाळाराम पाटील आणि विधानसभेचे स्थानिक आमदार भरतशेठ गोगावले उपस्थित राहणार आहेत. रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे, बांधकाम व अर्थ सभापती ॲड. निलीमा पाटील, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे व सुमन कुंभार, मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, जिल्हाधिकारी निधी चौधरी, आरोग्य उपसंचालक मुंबई मंडळ ठाणे डॉ.गौरी राठोड, आरोग्य सेवा पुणे संचालक डॉ.अर्चना पाटील, आरोग्य सेवा मुंबई डॉ. साधना तायडे यांच्यासह पोलादपूर पंचायत समिती सभापती नंदा चांदे, उपसभापती शैलेश सलागरे, सदस्य दिपिका दरेकर व यशवंत कासार, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. गुलाबराव सोनावणे आणि गटविकास अधिकारी धनंजय जगताप आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# सडक सुरक्षा जीवन रक्षा माणगांव पोलिसांचे मार्गदर्शन



**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रायगड जिल्ह्यात रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त माणगांव वाहतूक शाखेने ३२ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२१ अंतर्गत, दुचाकी वाहन चालविताना हेल्मेटचा व चारचाकी चालविताना सीट बेल्टचा वापर करावा. वेगमर्यादेपेक्षा अतिवेगात वाहन चालवू नये, मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, वाहन चालवताना लेन कटिंग करू नये, मोबाईलचा वापर करू नये. पादचाऱ्यांनी नेहमी फूटपाथचा वापर करावा. रस्त्यावर धोकादायक रित्या वाहन चालवू नये, पादचाऱ्यांनी झेब्रा क्रॉसिंग ठिकाणीच रस्ता ओलांडावा. वाहन चालवताना पादचारीना प्राधान्य द्यावे. असे माणगांव पोलीसांनी सडक सुरक्षा जीवन रक्षा या विषयी नियमांचे मार्गदर्शन केले.

या वेळी माणगांव चे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील, सहाय्यक पोलीस निरिक्षक कावळे, पोलीस उपनिरिक्षक करे, वाहतूक शाखेचे लालासाहेब वाघमोडे, रावसाहेब कोळेकर व इतर पोलीस कर्मचारी यांचे हस्ते वाहनांना रिफ्लेक्टर लावणेत आले. मुंबई-गोवा महामार्गावर जागो जागी नियमांचे फलक लावुन जनजागृती करण्यात आली आहे.

वाहन चालकांनी वाहतुकीचे नियमांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन देखिल जिल्हा वाहतूक शाखे तर्फे वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक रवींद्र शिंदे यांनी जिल्हयातील नागरिकांना केले आहे.

# मोडकळीस आलेल्या पाली बसस्थानकाला मुहूर्त केव्हा? सर्व सामान्य जनतेचा सवाल

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली बस स्थानकाचा आराखडा तयार असून तशी तरतूद देखील करण्यात आल्याचे समजते. एका ठेकेदाराने ते कामही चालू केले होते. परंतु ते काम तसेच सोडून ठेकेदाराने पलायन केले. त्यानंतर कंट्रोल रुम, चालक वाहक आणि प्रवाशांना निवारा शेडचे काम पुर्ण झाले. असले तरी आज ही मोडकलीस आलेल्या इमारतीचे सहारा घ्यावा लागत आहे.

पाली बस स्थानकाची इमारत अत्यंत जीर्ण झाली असून ती केव्हाही कोसळून पडेल आणि याखाली मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पाली बसस्थानक हे सुधागडातील मुख्य बसस्थानक आहे. रायगड जिल्हासह मुंबई, ठाणे, पुणे सारख्या शहरांतून एस टी बसेस पालीत येत जात असतात. पालीत बल्लाळेश्वराचे देवस्थान असून महाराष्टारातून बहुसंख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. तसेच प्रवासीच्या ही जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही.

पाली बस स्थानकाला कामाचा मुहूर्त केव्हा सापडणार ? असा प्रश्न सर्व सामान्य जनतेला पडले आहे.



# पुणे रोहा एसटी बसचे पालीमध्ये भर रस्त्यात ठिय्या

## पंक्चर टायर बदलण्यास लागले अडीच तास

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पुणे रोहा एसटीचा पाली बस स्थानकाच्या अलीकडे भर रस्त्यात गुरुवारी (ता.२१) सकाळी टायर पंक्चर झाला होता. टायर बदलण्यास तब्बल अडीच तास लागल्याने गाडीतील प्रवासी वैतागले होते. तर या मार्गावरील वाहतूक देखील ठप्प झाली होती.

पुण्यावरून रोह्याला जाणारी ही बस सकाळी १०:३० वाजता पालीत दाखल झाली होती. मात्र बस स्थानकाच्या अलीकडेच भर रस्त्यावर एसटीचा टायर पंक्चर झाला. टायर काढण्यासाठी बराच वेळ जॅक लागत नव्हता. त्यानंतर अथक परिश्रमाने जॅक चढवून टायर काढण्यात आला व नवीन टायर बसविण्यात आला.



तोपर्यंत दोन ते अडीच तास उलटून गेले होते. यावेळी येथील नागरिक संदीप सिलिमकर व इतर नागरिकांनी टायर बदलण्यासाठी सहाय्य केले. तर अनेकांनी बघण्यासाठी गर्दी देखील केली होती.

# पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे--

शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१ रोजी, सकाळी ९.०० वा सुतारवाडी निवासस्थान येथून शासकीय वाहनाने पुनाडे तर्फे नाते, महाडकडे प्रयाण. सकाळी १०.३० वा. पुनाडे तर्फे नाते येथे आगमन व रायगड व्हॅली फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि.आयोजित निसर्गायण प्रक्रिया केंद्र उद्घाटन व शुभारंभ सोहळ्यास उपस्थिती. स्थळ : पुनाडे तर्फे नाते ता.महाड. सकाळी ११.३० वा. पुनाडे तर्फे नाते येथून शासकीय वाहनाने पोलादपूरकडे प्रयाण. दुप-ारी १२.३० वा. पोलादपूर येथे आगमन व मुख्यमंत्री



ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ते भूमिपुजन कार्यक्रमास उपस्थिती. आड ते किनेश्वर रस्ता, रा.मा.१३८ कापडे बु. ते महाळुंगे रस्ता, पळचिल सावरीची वाडी ते जलाची वाडी रस्ता ता.पोलादपूर, दुपारी १.४५ वा. पळचिल सावरीची वाडी ते प्राथमिक आरोग्य केंद्र पळचिलकडे प्रयाण. दुपारी २.०० वा. प्राथमिक आरोग्य केंद्र, पळचिल उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी २.३० ते ३.०० वा. राखीव. दुपारी ३.०० वा. पळचिल ता.पोलादपूर येथून शासकीय वाहनाने माणगावकडे प्रयाण. सायं. ४.३० वा. माणगाव येथे आगमन व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ते भूमिपुजन कार्यक्रमास उपस्थिती. रा.मा.९८ ते पाणोसे रस्ता, रा.मा.१७ ते दाखणे ते मुंढेवाडी रस्ता, रा.मा.१७ ते कालवण ते कालवण आदिवासीवाडी रस्ता ता.माणगाव. सायं.६.०० वा. पाणोसे रस्ता ता.माणगाव येथून शासकीय वाहनाने मेढा ता.रोहाकडे प्रयाण. सायं.७.०० वा. मेढा येथे आगमन व हरिनाम सप्ताह कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ : मेढा, ता.रोहा. सोईनुसार मेढा येथून शासकीय वाहनाने सुतारवाडीकडे प्रयाण. सुतारवाडी येथे आगमन व राखीव.

# विंधणे येथे शाळेच्या वर्ग खोल्या आणि सभागृहाचे शानदार उदघाटन

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण तालुक्यातील विंधणे येथिल जेष्ठ समाजसेवक स्व. धाया बाळू जोशी व रुक्मिणी धाया जोशी यांच्या स्मृती प्रित्यर्थ साई कन्स्ट्रक्शनचे मालक पी डी जोशी यांनी बांधलेल्या विंधणे प्राथमिक शाळेच्या वर्गखोल्या व सभागृहाचे उदघाटन उरणचे सभापती सागर कडू यांच्या उपस्थितीत पी डी जोशी व त्यांच्या पत्नी मिनाक्षी जोशी यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात करण्यात आले.

विंधणे येथिल प्राथमिक शाळेच्या इमारतीची दुर्दशा झाली होती. विद्यार्थ्यांना गळक्या छपराखाली जीव मुठीत घेऊन शिक्षण घ्यावे लागत होते. शासकीय निधीतून काही वर्गखोल्या बांधल्या गेल्या असल्या तरी त्या पुरेशा



नसल्याने तीन वर्गखोल्या व सभागृहाचे बांधकाम विंधणे गावातील दानशूर व्यक्तिमत्त्व व साई कन्स्ट्रक्शनचे मालक पी डी जोशी यांनी लाखो रुपये खर्चून पूर्ण केले आहे.आज या वर्गखोल्या आणि सभागृहाचे उदघाटन शाळा समितीने पी डी जोशी व त्यांच्या पत्नी मिनाक्षी जोशी यांच्या हस्ते केले. त्यावेळी उरण पंचायत समितीचे सभापती सागर कडू यांची उपस्थिती आवर्जून होती. यावेळी झालेल्या कार्यक्रमात सागर कडू यांनी आपले विचार व्यक्त करताना, सध्या प्रतिष्ठा जपण्यापेक्षा मुलांना संस्कारित करणारे शिक्षण देणे गरजेचे असल्याचे मौलिक मत व्यक्त केले. शाळेच्या मुख्याध्यापिका स्रगधरा पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी पं स सदस्या वैशाली पाटील, उपसभापती शुभांगी पाटील, गटशिक्षणाधिकारी अंजने यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी पं स च्या उपसभापती शुभांगी सुरेश पाटील, जि प सदस्या कुंदा ठाकूर, मिनाक्षी जोशी, वैजनाथ ठाकूर, पं स सदस्य हिराजी घरत, वैशाली पाटील, दिशा प्रसाद पाटील, गट शिक्षणाधिकारी अंजने, संगीता चंदने, अभिजीत मटकर, पी जी म्हात्रे, प्रमोद शेळके, चंद्रकांत म्हात्रे, मनिषा कोळी, विद्या पाटील, शेडगे, आदी मान्यवर सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# पेण परिवहन कार्यालयाच्या वतीने शिकाऊ वाहन चालकांसाठी मुरुड येथे रस्ता सुरक्षा अभियान उपक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

परिवहन कार्यालय, पेण (रायगड) च्या वतीने दि.२० जानेवारी रोजी मुरुड येथील शिबीर कॅम्प येथे शिकाऊ अनुज्ञप्ती आणि वाहनचालक चाचणीसाठी आलेल्या अर्जदारांना मोटार वाहन निरीक्षक यांनी ३२ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२१ च्या निमित्ताने माहितीपत्रके वाटली. तसेच वाहतूक नियमांचे महत्व विषद करणारे व्याख्यान आयोजित केले.

३२ व्या रस्ता सुरक्षा अभियानाचे घोषवाक्य सडक सुरक्षा जीवन रक्षा असे असून सडक सुरक्षा जीवन रक्षा हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे व सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, याबद्दल मोटार वाहन निरीक्षक किरण पाटील व दिपक कोकणे यांनी



मार्गदर्शन केले. मोटार वाहन निरीक्षक श्री.पाटील व कोकणे यांनी यावेळी वाहतूक नियमांची व चिन्हांची माहिती असलेली माहितीपत्रके वाटली. तसेच जीवनदूत' म्हणून कार्य करणे आवश्यक आहे, याबाबतचे महत्व विषद केले. विशेषतः अपघातग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिली.